# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## नोटीस

## प्रथम मुदतवाढ

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत नगर पथ विक्रेता समितीवर पूढील संवर्गातून नामनिर्देशनासाठी इच्छूक व्यक्तीकडून अर्ज मागविणे बाबत.

क) अशासकीय संघटना ख) समूदाय आधारीत संघटना
ग) निवासी कल्याण संघ घ) व्यापारी संघ ङ) पणन संघ

नगर पथ विक्रेता समितीच्या नामनिर्देशित सदस्यांसाठीची किमान अर्हता.
१) संघटनेची किंवा संघाची, नियम ११ च्या उप-नियम (४) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२) संघटना किंवा संघ, मागिल तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करावेत.
३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.
४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.
५) संघटना किंवा संघ यांना, त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनूभव असावा.

** नगर पथ विक्रेता समिती सदस्यांची निवड -
१) जेव्हा जेव्हा अधिक अर्ज प्राप्त होतील तेव्हा पदसिध्द सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या नगर पथ विक्रेता समितीस, नियम ११ (२) (ख) (दोन) ते ११ (२) (ख) (पाच) आणि-११ (३) (ख) (दोन) ते ११ (३) (ख) (पाच) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गाकरीता नामनिर्देशित करावयाच्या प्रतिनिधींची शिफारस करता येईल.
२) महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिति, मुख्याधिकारी, संघटनेच्या किंवा संघाच्या पथ प्रतिनिधींमधून नगर पथ विक्रेता समितीचा सदस्य म्हणून अशा सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये, नामनिर्देशन करण्याकरीता शासनाकडे, शिफारशी आणि अर्ज अग्रेषित करील.
** नगर पथ विक्रेता समितीच्या सदस्यांची मूदत -
१) पदसिध्द सदस्यांव्यतिरिक्त, नगर पथ विक्रेता सदस्यांची मूदत ही, या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, निवडणूका घेतल्यानंतर, नगर विक्रेता समितीची जी पहिली बैठक घेण्यात येईल त्या दिनांकापासून पाच वर्षे इतकी असेल.
२) समितीवर सदस्यांना निवडून द्यावयाची किंवा यथास्थिति, नामनिर्देशित करावयाची प्रक्रिया, ही त्यांची मुदत संपण्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल.
** नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांचे नावे परिपूर्ण अर्ज सादर करावेत.

XXX
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका